# येशूने अनेकदा घरोघर जाऊन भेट दिली

मुलांना शिकवणाऱ्यांनी V2b हा मुलांचा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, तू आमच्यामध्ये राहायला आलास, आमच्या घरी येऊन आमची भेट घेतलीस अशा प्रकारे तू आमच्यावरील प्रेम व्यक्त करून आमच्यासाठी तारण आणलेस. कित्येक लोकांनी तुला ओळखले नाही किंवा स्वागत केले नाही. तू कोण आहेस हे पाहण्यासाठी तू आमचे डोळे उघडलेस म्हणून धन्यवाद देतो. तुझी आवश्यकता असणाऱ्या लोकांच्या घरोघरी सुवार्ता घेऊन जाण्यासाठी आमचे साहाय्य कर.''

## 1. प्रार्थना व येशूच्या कार्याचा अभ्यास करून मनाची तयारी करा

**पाहा लूक 19:1-10 मध्ये** जक्कय व त्याच्या कुटुंबाचे तारण कसे झाले. (उत्तरे पुढे दिली आहेत)

- जक्कयाने येशू व त्याचा संदेश याबद्दल कसे स्वारस्य दाखविले? *(पाहा वचन 3)*
- येशूने जक्कयावरील आपली प्रीती व क्षमाशीलता कशी व्यक्त केली? *(पाहा वचन 5)*
- येशूने जक्कयाशी केलेले संभाषण ऐकून प्रत्येकजण आश्चर्यचकित का झाला? *(पाहा वचन 7)*
- जक्कयाने त्याला झालेला पश्चात्ताप व वाटलेली कृतज्ञता कशी व्यक्त केली? *(पाहा वचन 8)*
- येशूने जक्कयाला, मी तुझ्या घरी येणार असे का सांगितले? *(पाहा वचन 10)*

**पाहा प्रे. कृ. अध्याय 10** मध्ये कर्नेल्य, त्याचे कुटुंबिय आाणि त्याचे अनेक मित्र ह्यांचे तारण कसे झाले?

- यहूदी रूढी परंपरांचे पालन न करणाऱ्या लोकांना भेटण्यासाठी देवाने पेत्राला कसे तयार केले? *(पाहा वचने 9-16)*
- कर्नेल्याला भेटण्यास पेत्राबरोबर कोण गेले? *(पाहा वचन 23)*
- कर्नेल्याच्या घरी कोण पेत्राची वाट पाहात होते? *(पाहा वचन 24)*
- उपदेश करण्यास सुरुवात करण्यापूर्वी पेत्राने काय केले? *(पाहा वचन 29)*
- पेत्राने येशूविषयी कोणत्या गोष्टी सांगितल्या? *(पाहा वचने 38-43)*
- कर्नेल्याने त्याचे कुटुंबिय व मित्रमंडळी ह्यांच्या समवेत कधी बाप्तिस्मा घेतला? *(पाहा वचने 47 व 48)*
- नवीन विश्वासणाऱ्यांचा बाप्तिस्मा झाल्यावर पेत्र व त्याच्या यापोतील सहकाऱ्यांनी काय केले?*(पाहा वचन 48)*

**पाहा प्रे. कृ. 9:32-43** मध्ये घरोघरी जाऊन भेटी देण्याचा आणखी हेतू.

## 2. आठवड्यातील कार्यक्रमांबद्दल तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करा

मंडळीतील लोकांच्या घरोघरी जाऊन भेटी घेण्यासाठी योजना तयार करा. भेटीसाठी जाताना इतरांना सोबत न्या म्हणजे त्यांनाही काही शिकता येईल. मंडळीतील सभासदांची अशा प्रकारे रचना करा की सर्व कुटुबांना मंडळीतील इतर लोक नियमितपणे भेटी दतील.




आजारात व संकटांत असणाऱ्यांना जाऊन भेटण्यासाठी योजना तयार करा, म्हणजे त्यांच्याकरिता तुम्हांला प्रार्थना करता येईल.

येशूची ओळख नसणाऱ्या मित्रांच्या व कुटुंबियांच्या घरांना भेटी देण्यासाठी योजना करा, म्हणजे त्यांना ख्रिस्ताबद्दल सांगता येईल. भेटी देण्यास जाताना इतरांना बरोबर घ्या किंवा त्यांच्या मित्रांच्या व नातेवाईकांच्या घरी त्यांच्या सोबत जा; यामुळे त्यांना तुमच्याकडून काही शिकता येईल. नवीन ख्रिस्ती लोकांना येशूविषयी आणि त्याने त्यांच्याकरिता काय केले त्याबद्दल साक्ष देण्यास शिकवा. म्हणजे त्यांना त्याचे मित्र व कुटुंबिय ह्यांना साक्ष देता येईल.

### 3. पुढील उपासनेविषयी सहकाऱ्यांशी चर्चा करा.

सध्याच्या गरजा व स्थानिक रीतीरिवाज ह्यांना अनुरूप कार्यक्रम निवडा.

पेत्र आणि त्याचे सहकारी कर्नेल्याच्या घरी जाऊन सुवार्ता सांगतात हा कथा वृत्तांत सांगा किंवा त्याचे नाट्यीकरण करा.

भाग 1 मधील प्रश्न विचारा.

**स्पष्ट करा:**

- एकमेकांना प्रोत्साहन देऊन प्रार्थना करण्यासाठी आम्ही एकमेकांच्या घरी जाणे अगत्याचे आहे.
- साधारणपणे आपण एकेकट्याने नाही तर दोघा - दोघांनी किवां गटागटाने जायचे.
- लोकांना नावे ठेवायला संधी मिळू नये म्हणून पुरुषाने एकट्या -दुकट्या स्त्रीला तिच्या घरी जाऊन भेटण्याचे टाळावे.

पेत्राने प्रोत्साहन देण्यासाठी इतर विश्वासणाऱ्यांची भेट घतेली तसेच आजाऱ्यांसाठी प्रार्थना केली. देवाने त्याचा उपयोग ख्रिस्ती बहीणीला मरणातून उठविण्यासाठी करून घेतला.

पेत्र कर्नेल्याच्या घरी गेला त्याप्रमाणे आपणही ख्रिस्ताची ओळख नसणाऱ्यांची घरी जाऊन भेट घेतली पाहिजे. येशू विषयाचा साधा सोपा संदेश पेत्राने कर्नेल्याला दिला. हाच संदेश येशूची ओळख नसणाऱ्यांच्या घरी गेल्यावर आपल्यालाही देता येईल.

पेत्राने येशूविषयी सांगितलेल्या महत्वाच्या गोष्टी पुढीलप्रमाणे:

अ) सर्व लोकांची देवाशी ओळख व्हावी व त्यांचे तारण व्हावे अशी त्याची इच्छा आहे. वचन 34-35.

ब) देवाने येशूला पवित्र आत्म्याने अभिषेक केला. त्याला चांगले करण्याचे, आजाऱ्यांना आरोग्य देण्याचे आणि सैतानाच्या सत्तेखाली बरे करण्याचे सामर्थ्य दिले. वचन 37-38.

क) लोकांनी योशूचा मृत्यू त्याचे पुरले जाणे आणि पुन्हा जिवंत झाल्यावर देणे, ह्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या आहेत. वचने 39-41

ड) संदेष्ट्यांनी पूर्वी साक्ष दिल्याप्रमाणे येशू त्याच्या नावाद्वारे आपल्या पापांची क्षमा करतो. वचन 43.

ई) ही सुवार्ता प्रत्येकाला सांगण्याची येशू आम्हांला आज्ञा करतो. वचन 42.

**1 पेत्र 4: 2-9** वाचा पाहुणचार करणाऱ्यांना देव आशीर्वाद देतो हे स्पष्ट करा.



प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी लूक 6:36-50 वाचा, यात एका स्त्रीने आपल्या आसवांनी येशूचे पाय धुतल्याचा वृत्तांत आहे. विस्ताराने स्पष्ट करून सांगा की, आपण येशूच्या सान्निध्यात येतो तेव्हा पवित्र आत्मा आमच्या पापाविषयी आमची खात्री पटवतो. आम्ही आमची पातके कबूल करावीत तसेच देवाने केलेली पापक्षमा किती महान आहे याचीही आठवण करावी. आमच्या पापीपणाची आम्हांला जितकी अधिक जाणीव होईल तितकी त्याच्या महान कृपेबद्दलची आमची कृतज्ञता आणि प्रेम वाढीला लागेल.

मुलांनी तयारी केलेली नाटिका, कविता व प्रश्न सादर करण्यास संधी द्या.

देवाने विश्वासणाऱ्यांचा उपयोग इतरांची सेवा त्यांच्या घरांमध्ये करण्यासाठी कसा करून घेतला तसेच त्यांना इतरांचा पाहुणचार केल्याने देवाने कसा आशीर्वाद दिला याविषयी त्यांना साक्ष किंवा अहवाल देण्यास सांगा.

दोन किंवा तीन जणांचे गट करून एकमेकांसाठी प्रार्थना करा, मार्गदर्शन करा आणि एकमेकांच्या घरी जाण्याची तसेच विश्वास नसणाऱ्यांच्या घरी भेट देण्याविषयी योजना आखा.

पाठ करा योहान 1:14.

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net